## : रे.मु.नं. ५०५/२०१४ मधील अर्ज नि.५ वरील आदेश :

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ३९ नियम १ नुसार तुर्तातुर्त मनाई ताकीदीचा अर्ज दिला आहे. अर्ज वाचला. अर्जावर प्रतिवादींनी दिलेले उत्तर वाचले. वादींतर्फे मा.वकिल श्री.वाय. बी. पाटील आणि प्रतिवादींतर्फे मा.वकिल श्री. जे. ए. शेख यांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादींचे कथन असे की, दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती या वादी व प्रतिवादींच्या मालकीच्या व कब्जा वहिवाटीच्या आहेत. बाबुराव बुगे हे कुटुंबाचे मुळ पुरुष होते. बाबुराव यांच्या मृत्यूनंतर त्यांची दोन मुले गंगाराम व रंगनाथ यांच्याकडे सदरील मिळकती वारसा हक्काने आल्या. गंगाराम थोरला असल्यामुळे कर्ता म्हणून त्याच्याच नावाची नोंद दावा मिळकतीला लागली. रंगनाथ यांची त्यांचे हयातीत दावा मिळकतीला नोंद झाली नाही. गंगाराम यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा मारूति व मारूतिच्या मृत्यनंतर त्यांचा मुलगा म्हणजेच प्रतिवादी क्र.१ बाबू मारूति बुगे यांच्या नावाची नोंद झाली. दावा मिळकतीस प्रतिवादी नं. १ यांच्याच नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेउन यांनी सर्व दावा मिळकतीस महसुल दरबारी अर्ज देउन वादी यांचे अपरोक्ष प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी त्याच्या नावाची नोद करून घेतली. रंगनाथ मयत झाल्यानंतर त्यांची पत्नी कौसाबाई यांनी तहसिलदार पारनेर यांच्याकडे अर्ज देउन दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये रंगनाथचे वारस म्हणून त्यांची व मुलगा शांताराम यांच्या नावाची नोंद करण्याची विनंती केली परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे वादी नं. १,२,४ व ५ यांचें वडिल व वादी नं. ३ चे पती यांचे गावचे हक्कपत्रकी नोंद न होताच ते मयत झाले. रंगनाथ यांचा दावा मिळकतीमध्ये आठ आणे हिस्सा होता व आहे. दावा मिळकत वादी व प्रतिवादी हे एकत्रात करत आले आहेत. मात्र दावा मिळकतीस वादी यांच्या नावाची नोंद नसल्याचा गैरफायदा घेउन सुमारे दोन महिन्यापासून प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकतीत असणारे सामाईक कब्जे वहिवाटीस हरकती सुरू केलेल्या आहेत. सन २०१५ मध्ये वादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा असणारा हिस्सा वाटून मागितला असता तुम्हाला एक गुंठा जमीनही देणार नाही असे म्हणून हिस्सा नाकारला. प्रतिवादीने दावा मिळकतीचे हस्तांतर करण्याचे प्रयत्न सुरू

केले आहे. दावा मिळकतीचे हस्तांतर केल्यास वादींचे कधीही न भूरुन येणारे मोठे नुकसान होणार आहे. सबब दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादींनी दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये असा त्यांच्याविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादीने अर्ज अमान्य केला आहे. प्रतिवादीचे म्हणणे खालीलप्रमाणे- वादीने दाव्यामध्ये ब-याचशा बाबी लपवून ठेवल्या आहेत व अपू-या कागदपत्रांच्या आधारावर सदर दावा केला आहे. वादीने दाखवलेली वंशावळ मोघम स्वरुपाची असून अपूर्ण आहे. वादीच्या दावा मिळकती एकत्र कुटुंबाच्या मालकी कब्जेवहिवाटीच्या होत्या असे केलेले कथन सत्य नाही. तसेच रंगनाथ यांच्या हयातीत त्यांच्या नावाची वडिलोपार्जित मिळकतीची नोंद करण्यात आली नाही व पुढे गंगाराम मयत झाल्यावर त्यांचा मुलगा मारुति गंगाराम याच्या नावावर मिळकती आल्या व मारुति गंगाराम मयत झाल्यावर त्यांचा एकुलता एक मुलगा बाबू मारुति याच्या नावावर सर्व मिळकती वारसाने आल्या ही कथने देखील प्रतिवादीला मान्य नाही. प्रत्यक्षात दावा मिळकती ही एकत्र कुटुंबाची मिळकत म्हणून मुळ पुरुष बाबूराव बुगे यांच्या वडिलोपार्जित मालकीची नसून फक्त गंगाराम याची आहे. याची रंगनाथ याला महिती होती. रंगनाथ पोलिस खात्यात होता व शिकलेला होता व त्याला सत्याची माहिती असल्यामुळे त्यांना त्याच्या हयातीत कधीही दावा मिळकतीची मागणी केली नाही. वादीने दावा मिळकती मुळ पुरुष यांच्या नंतर केवळ गंगाराम याच्या एकटयाच्या नावावर लागली व पुढे त्यांच्याच वारसांच्या नावे दावा मिळकतीची नोंद झाली हे योग्य कागदपत्राने दाखवलेले नाही. रंगनाथ बाबुराव बुगे यांच्या नंतर त्यांची पत्नी कौसाबाई हिने तहसिलदार पारनेर यांच्याकडे दावा मिळकतीच्या अर्ध्या हिश्याला नाव लावण्यासंदर्भात अर्ज केला होता परंतु त्याची दखल घेण्यात आली नव्हती. वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल नाही तसेच प्रथमदर्शनी बाजू नाही व वादी कोणत्याही प्रकारे तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळवण्यास पात्र नाही. सदरचा अर्ज फेटाळल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु मनाई हुकूम जारी केल्यास प्रतिवादीचे नुकसान होईल. वादीच्या पिढीला १०० वर्षानंतर अशा प्रकारे दावा करता येणार नाही. वादीने मिळतीचा सर्व इतिहास लपवून ठेवला आहे. सबब अर्ज रु. २५०००/- च्या खर्चासह फेटाळण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादींच्या कथनानुसार खालील मुद्दे उपस्थित होतात व माझे या मुद्दयांवर पुढीलप्रमाणे उत्तरे आहेत.

| **अ क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी अर्ज सकृतदर्शनी शाबीत करतात काय ? | नाही |
| २ | न्यायाचा तराजू वादींच्या बाजूने आहे असे वादी शाबीत करतात काय ? | नाही |
| ३ | अर्ज फेटाळल्यास वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल असे वादी शाबीत करतात काय ? | नाही |
| ४ | कोणता आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**: कारणमिमांसा :**

५. **मुद्दा क्र १ ते ४ बाबत :-**

अर्ज विषय पाहता मुददा क्र. १ ते ३ हे एकत्रात कारणमिमांसेसाठी घेण्यात येतात.

६. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर असे दिसून येते की अर्ज विषय अतिशय मर्यादित आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत हिंदू एकत्र कुटुंबाची पूर्वापार एकत्रित मिळकत असताना ती केवळ प्रतिवादीच्या शाखेने महसूल दरबाराच्या चूकीच्या नोंदीमुळे स्वत:च्या ताब्यात ठेवण्याचा बेत आखला आहे. वादीच्या म्हणण्यानसुार सध्या वादी व प्रतिवादी दावा मिळकती एकत्र कसत आहेत. परंतु आता त्यांच्यामध्ये जमीनीच्या वाटपावरुन बेबनाव झाला आहे. वादीने त्याची बाजू मांडण्याकरता नि. ४ सोबत २२ कागदपत्र दाखल केली आहेत त्यामध्ये दावा मिळकतीचा ८अ च्या उता-याची प्रत, सात बाराचे उतारे, दावा मिळकती संदर्भातील फेरफार नोंदी, मराठी भाषेतील जुन्या पत्राची छायांकित लॅमिनेटेड प्रत, कौसल्याबाई बुगे, मारूति बुगे व शांताराम बुगे यांचे मृत्यूप्रमाणपत्र, गंगाराम बुगे यांचा सन १९३१ जन्म मृत्यू उतारा असे कागदपत्र सामिल आहेत. प्रतिवादींनी त्यांच्या बाजूंनी कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसत नाही. वादीने हजर केलेले कागदपत्र पाहता त्यातील ८अ चे उतारे हे बाबू मारूति बुगे, मंदा बाबू बुगे व बापू बाबु बुगे यांच्या नावे आहे. तसेच वादीने हजर केलेले सात बाराचे उतारे बबूराव मारूति बुगे, मंदाबाई बाबूरव बुगे यांच्या नावाचे आहे. वादीने हजर केलेला फेरफार क्र १२४०८ हा दि. १४.

१२.१९५२ रोजी खातेदार गंगाराम बाबूराव बुगे मयत झाल्याचे दर्शवितो व त्या अनुषंगाने सात मिळकती त्यांच्या वारसांच्या नावे झाल्याचे दाखवतो. वादीने हजर केलेली एक छायांकित अर्जाची प्रत ही कौसाबाई बुगे यांनी तहसिलदार यांच्याकडे तक्रार दाखल केल्याचे दर्शवते. या कागदपत्रावरुन प्रथम दर्शनी दावा मिळकती या मुळ पुरुष बाबूराव बुगे यांच्याकडून त्याच्या खालील शाखांकडे आल्या असे दिसत नाही. प्रतिवादीने दावा मिळकती वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाचया असल्याचे व मुळ पुरुष बाबूराव यांच्याकडून त्याच्या वडिलांकडे आल्याचे अमान्य केले आहे. अशा परिस्थीतीमध्ये वादीचे कागदपत्र स्पष्ट नसताना त्याने तूतातूर्त मनाई हुकूम मागण्यासाठी प्रथमदर्शनी बाजू मांडली आहे असे म्हणता येत नाही. अशा प्रकारे जमीनीसदंर्भात वाद विषय असताना वर प्रमाणे जमीनीबाबत वडिलोपार्जित मिळकती असल्याचे योग्य त्या कागदोपत्री पुराव्याने दाखवले नसल्यामुळे वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल किंवा अपरिमित नुकसान देखील होताना आढळत नाही. सबब मुददा क्र १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देतो.

**मुददा क. ४ बाबत :-**

७. वादी ज्यावेळेस ठामपणे दावा मिळकतींबाबत मागणी मागत आहे त्यावेळेस या जमीनी कशाप्रकारे मुळ पुरुष बाबूराव बुगे यांच्यापासून खाली दोन मुलांकडे आल्या व त्यानंतर त्या इतर वारसांकडे जाणे आवश्यक होते हे दाखवणे गरजेचे होते. हे दाखवण्यात वादीला प्रथमदर्शनी पूर्णपणे अपयश आले आहे. केवळ एखादा छायांकित प्रतीतील तक्रारी अर्ज न्यायालसमोर मांडून प्रथम दर्शनी बाजू मांडली गेली आहे असे म्हणता येत नाही. वादीच्या बाजूने सकृतदर्शनी बाजू सोय गैरसोयीचा तराजू तसेच अपरिमित नुकसान यातील कोणताही मुद्दा जात नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. वादीने प्रथमदर्शनी बाजू नसताना अशा प्रकारे तूर्तातूर्त अर्ज करुन मनाई हुकूम मागणे योग्य वाटत नाही त्यामुळे अर्जाचा खर्च त्याच्यावर लादणे योग्य होईल. सबब खालील आदेश.

**: आ दे श :**

१. अर्ज खर्चासह फेटाळण्यात येत आहे.
२. अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

(अ.मा.पाटणकर)
दिनांक :- ०१/१२/२०१५. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
पारनेर

अ.मा.पाटणकर,दिवाणी न्ययाधीश क.स्तर, पारनेर